# एएनएम प्रवेश
# जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर

परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे ०२ जुन २०२५ पासून सुरु होणाऱ्या स्त्री साहाय्यकारी परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण (ए.एन.एम) दोन वर्ष कालावधीच्या प्रशिक्षणासाठी एकूण ४० जागांसाठी आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक, राआअ, मुंबई यांच्याकडुन प्राप्त आदेशानुसार खालील प्रमाणे स्त्री उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| प्रशिक्षण | अ. जा. | अ. ज. | विजा अ | भज ब. | भज क. | भज ड. | इमाव | | सामाजिक शैक्षणिक मागास प्रवर्ग | आर्थिक दुर्बल घटक | खुला | | आशा | एकुण जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | सर्व साधारण | दिव्यांग | | | सर्व साधारण | दिव्यांग | | |
| एएनएम | ०५ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | ०१ | ०४ | ०४ | ०९ | ०१ | ०२ | ४० |

**नियम व अटी :**

शैक्षणीक अर्हता भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यकीय शिक्षण मंडळ व शासन पत्र क्र.संआसे/शुश्रूषा/कक्ष७/टे-1/एएनएमप्रवेश प्रक्रिया/३२१६-२९२/२५ दि. २७/०५/२०२५ नुसार खालील प्रमाणे किमान शैक्षणिक अर्हताधारक उमेदवार संबंधीत प्रशिक्षणासाठी पात्र रहतील.

१) उमेद्वार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाची माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (१०+२) १२ वी शालांत प्रमाणपत्र परिक्षा विज्ञान, कला, वाणिज्य शाखेतून शासन मान्य संस्थेतुन खुल्या व राखीव प्रवर्गाकरिता कमीत कमी ४५ टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) उमेद्वार शारिरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे.

३) एएनएम हा एकुण दोन वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम पुर्ण वेळ व नियमित असल्याने सदर प्रशिक्षणादरम्यान इतर कोणतेही शैक्षणिक (नियमित अथवा दुरस्थ) अभ्यासक्रमास प्रवेश घेता येणार नाही.

४) आशा स्वयंसेविका उमेदवारांसाठी २ जागा राखीव असतील त्यांची निवड त्यांच्या गुणवत्तेनुसार करण्यात येईल. आशा उमेदवारांची सलग ३ वर्ष सेवा होणे आवश्यक आहे. त्यांच्यातील समबंध असल्यास त्यांचे तीन वर्षाचे एकत्रीत मानधन जास्त असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

५) वयोमर्यादा दि. ३१/०७/२०२५ रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षा पेक्षा कमी व ३५ वर्षा पेक्षा जास्त असु नये.

६) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

७) प्रशिक्षणासाठी विहित नमून्याचे अर्ज परिचर्या प्रशिक्षण महाविदयालय जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर येथे दि. ०२/०६/२०२५ ते १०/०६/२०२५ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते ०५.०० दरम्यान उपलब्ध राहतील.

८) प्रवेश अर्ज शुल्क खुल्या प्रवर्गासाठी ४००/- रुपये व राखीव प्रवर्गासाठी २००/- एवढे असेल.

९) संपूर्ण भरलेले अर्ज दि. ०२/०६/२०२५ ते १२/०६/२०२५ पर्यत सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात स्विकारले जातील. उशिरा आलेले, अपुर्ण भरलेले, उमेदवाराची सही नसलेले, सर्व आवश्यक प्रमाणपत्र व शासकिय रुग्णालयतील सक्षम वैदयकिय अधिकारी यांनी प्रमाणीत केलेले वैदयकिय प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१०) प्रवेश शैक्षणिक अर्हतेच्या गुणवत्तेनुसारच देण्यात येईल व वैदयकिय फेर तपासणी केल्यानंतरच निश्चित करण्यात येईल.

११) उमेदवारास मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१२) प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांना वसतीगृहाची सुविधा शासनाने निर्धारित केलेले शुल्क घेऊन उपलब्ध करण्यात येईल मात्र त्यांच्या व पालकांच्या सम्मतीने विद्यार्थीनीने विद्यालयात नियमित उपस्थित राहण्याच्या अटीवर अनिवासी प्रशिक्षणाची अनुमती देण्यात येईल.

१३) निवड झालेल्या उमेदवारांनी सादर केलेले प्रमाणपत्रे खोटे आढळल्यास त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता प्रशिक्षणातुन काढण्यात येईल.

१४) निवड झालेल्या उमेदवारांना शैक्षणिक वर्षाचे अभ्यासक्रम शुल्क प्रवेशाच्या वेळीच भरावी लागेल. व त्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्राहय धरला जाईल.

१५) संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी प्रशिक्षण अर्धवट सोडून गेल्यास व कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास लॅप्स ऑफ सिट चे रु. २५,०००/- इतके शुल्क आकारण्यात येईल.

१६) समुपदेशन पात्र उमेदवारांचे समुपदेशन व मुळ प्रमाणपत्र पडताळणीसाठी दि. १८/०६/२०२५ सकाळी ९:०० वाजता परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे करण्यात येईल. उमेदवाराने समुपदेशनास मुळ प्रमाणपत्रासह स्वखर्चाने हजर रहाणे आवश्यक आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक
अहिल्यानगर

विमाका/नाशिक/जाहिरात/८०/२०२५